RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
अँड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

**दि. १२ जुलै २०२६**



१९४१- म्युनिसिपल कामगार संघाच्या अधिवेशन प्रसंगी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.
१९४९- संत गाडगेबाबा व डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भेट.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

रविवार १२ जुलै २०२६ | वर्ष : ६ | अंक : १९२ | दैनिक | किंमत : ₹५/-
Sunday, 12 July 2026 | Year : 6 | Issue : 192 | Daily | Rate: Rs. 5/-

## मोशी इमारत दुर्घटना

# ८ जण अजूनही ढिगाऱ्याखाली

**पुणे:** मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा डोंगर कोसळून ३ दिवस उलटले. तब्बल ७४ तास होऊनही ढिगाऱ्याखाली अडकलेले आठ कामगार अजूनही सापडले नव्हते. आताच्या समोर आलेल्या महिनीनुसार त्या ८ पैकी एका कामगाराचा मृतदेह सापडला आहे, अजूनही ७ कामगार ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. त्यापैकी ३ जण बचाव पथकाला दिसल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्या तिघांनाही बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे

प्रत्येक तासागणिक आशा मावळत आहे, तर घटनास्थळी नातेवाईकांच्या आक्रोशाचा बांध फुटत आहे. ढिगाऱ्यातून बाहेर आलेल्या एका कामगाराने, आत सगळे आहेत... त्यांना खूप दुखापत झाली आहे... ते 'आई... आई...' अशी हाक मारत आहेत, असे सांगितल्याचा दावा नातेवाईक करत आहेत. हा दावा अधिकृत नसला तरी त्यानंतरही बचावकार्याला अपेक्षित वेग न मिळाल्याचा आरोप होत असल्याने नातेवाईकांचा संताप तीव्र झाला आहे.

दुर्घटनेनंतर सुरुवातीला अत्यल्प यंत्रसामग्रीने काम सुरू असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. त्यानंतर त्यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्यानंतरच घटनास्थळी अधिक पोकलेन, हायवा आणि इतर यंत्रणा वाढल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्यक्षात दिसणाऱ्या यंत्रणेची संख्या आणि प्रशासनाने सांगितलेल्या आकड्यांमध्ये तफावत असल्याचाही दावा दिसत आहे.



मात्र, महापालिका आयुक्त विजयकुमार सूर्यवंशी यांनी घटनास्थळी 12 पोकलेन कार्यरत असून आणखी 10 मागविण्यात आल्याचा दावा केला आहे.

एनडीआरएफच्या गॅस डिटेक्टरमध्ये मोठ्या प्रमाणात मिथेन वायू आढळल्याचे आयुक्तांनी सांगितले. त्यामुळे बचाव पथकांना जास्त वेळ आत काम करणे धोकादायक ठरत असून ऑक्सिजन सिलिंडर घेऊन आत जाणेही जोखमीचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महापालिका आयुक्त विजयकुमार सूर्यवंशी आणि मदत व पुनर्वसन मंत्री गिरीश महाजन यांनी ही घटना नैसर्गिक असल्याचे म्हटले आहे. मात्र या भूमिकेवर स्थानिक नागरिक आणि नातेवाईक प्रश्न उपस्थित करत आहेत.कचऱ्याचा डोंगर एवढा उंच कसा झाला ? त्याच्या लगत प्रशासकीय इमारत कशी उभारली गेली? सुरक्षा नियमांचे पालन झाले होते का? धोक्याची पूर्वकल्पना प्रशासनाला नव्हती का? या प्रश्नांची उत्तरे चौकशीतून समोर आली पाहिजेत अशी मागणी होत आहे.

महापौर रवी लांडगे यांनी नातेवाईकांच्या भावना रास्त असल्याचे मान्य करत बचावकार्य आणखी वेगाने करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्याचे सांगितले.

### मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत आणि नोकरीची घोषणा

प्रकल्प चालवणाऱ्या अँटोनी वेस्ट ग्रुपकडून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी 25 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार असून, कुटुंबातील एका इच्छुक सदस्याला कंपनीमध्ये नोकरी देखील दिली जाणार आहे. याशिवाय जखमी कर्मचाऱ्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च कंपनी उचलणार असून, मृतांच्या लहान मुलांच्या शिक्षणाची जबाबदारीही कंपनीने स्वीकारली आहे. या दुर्घटनेमुळं अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांना आर्थिक आधार मिळावा आणि भविष्यातील उपजीविकेची चिंता कमी व्हावी, या उद्देशाने ही मदत जाहीर करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 10 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. तसंच राज्य सरकारकडूनही प्रत्येकी 5 लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळं प्रत्येक मृताच्या कुटुंबाला विविध माध्यमांतून मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य मिळणार आहे.

### मृत्यूशी झुंज देणाऱ्या सुजाता शिंदेंनी सांगितला दुर्घटनेचा थरार



घटना ज्यादिवशी घडली त्या दिवशी बचावकार्य करत 11 जणांना बाहेर काढण्यात आलं. यामध्ये बचावलेल्या सुजाता शिंदे या सहा तास ढिगाऱ्याखाली अडकल्या होत्या. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांनी या घटनेबाबत थरारक अनुभव सांगितला. आम्ही दुपारी सर्वजण जेवायला बसलो होतो. आम्ही जेवण सुरूच करणार होतो. तितक्यात 'एसएलएफचा डोंगर कोसळला अस जाणवलं. मी मागं वळून बघितलं तर कचऱ्याचा तो डोंगर आमच्या इमारतीच्या दिशेनं पुढं सरकत असल्याचं जाणवलं. हे पाहताच आम्ही पाच ते सहा जण तातडीनं दरवाज्याच्या दिशेनं पळालो. पण बाहेर पडताच कचऱ्याच्या प्रचंड लोटामुळं आम्ही दूर फेकेलो गेलो आणि ढिगाऱ्याखाली अडकलो. तिथं सर्वत्र अंधार पसरला आणि नक्की काय घडलं? कळालंच नाही. काही वेळानं बाहेर कोणाचे तरी आवाज येत होते. मला जाणवलं की बाहेर दोन-तीन जण आहेत आणि ते कोणाचातरी शोध घेत आहेत. मी लगेच त्यांना ओरडून प्रतिसाद दिला, 'मी इथं अडकले आहे, मला बाहेर काढण्याचा प्रयत्न करा.' तोपर्यंत मी स्वतःला सावरत बाजूला पडलेल्या फरशा आणि ढिगारा स्वतःच्या हातानं बाजूला सारत त्यांच्यापर्यंत जाण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आमचे सहकारी राम सर यांनी माझा हात खेचून मला बाहेर काढलं, असा थरारक प्रसंग सुजाता शिंदे यांनी सांगितला. इमारत कोसळली तेव्हा आतमध्ये माझ्यासह राम सर, रणवीर सर, सचिन (सचिन दबडगाव), आरडी साहेब (दादासाहेब आडे), सोमनाथ सर हे सर्व जण ढिगाऱ्याखाली दबले गेले होते. आम्ही सहा ते सात जण जवळपास पाच तास त्या ढिगाऱ्याखाली अडकलो होतो. यानंतर बचावकार्य करणाऱ्या पथकांनी स्लॅब आणि काँक्रीट फोडण्याचं काम सुरू केलं. आम्ही आतमध्ये पाच ते सहा जण जिवंत आहोत. आमच्यापर्यंत तातडीनं मदत पोहोचवा, असा प्रतिसाद आम्ही त्यांना दिला. पाच तास आतमध्ये असताना रणवीर सरांची प्रकृती बिघडत चालली होती. बचाव पथकानं अत्यंत शिताफीनं आमच्यापर्यंत पाणी पोहोचवलं. त्या पाण्यामुळं रणवीर सरांचे प्राण वाचले आणि नंतर आम्हाला एकापाठोपाठ एक सुखरूप बाहेर काढलं, असा थरारक अनुभव यावेळी सुजाता शिंदे यांनी सांगितला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत विद्यापीठाविरोधात दिशाभूल करणारा प्रचार

**नागपूर :** भन्ते आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय येथील कर्मचाऱ्यांचे वेतन विद्यापीठाने थांबविल्याचा आरोप करणारी बातमी पूर्णपणे असत्य, दिशाभूल करणारी व समाजात संभ्रम निर्माण करणारी आहे. त्यांनी विद्यापीठाच्या विरोधात केलेले आरोप वस्तुस्थितीशी विसंगत असून त्यामध्ये कोणतेही तथ्य नाही.

याबाबतची खरी वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे : प्रा. दीपा पान्हेकर यांची प्रभारी प्राचार्य म्हणून झालेल्या नियुक्तीचा कार्यकाळ १५ जून २०२६ रोजी संपुष्टात आला. त्यानंतर प्रा. पान्हेकर यांचा २०२६-२७ च्या कालावधीसाठी नियुक्ती करण्याचा नवा प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविण्यात आला होता. विद्यापीठाने संबंधित नियम, अधिनियम व प्रचलित तरतुदीनुसारच ३ जुलै २०२६ रोजी तो प्रस्ताव नामंजूर केला. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्यांचे वेतन विद्यापीठामुळे थांबले असल्याचा आरोप पूर्णपणे निराधार आहे. प्रा. दीपा पान्हेकर यांचा कार्यकाळ संपल्यामुळे त्यांना कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे परिपत्रकावर सही करण्याचा अधिकार नसल्यामुळे वेतनाचे परिपत्रक सहसंचालक उच्च शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आले नाही. त्यामुळे यात उच्च शिक्षण विभागाची कोणतीही चूक नाही. गेल्या तीन-चार दिवसांपासून प्रा. पान्हेकर यांनी कर्मचाऱ्यांमध्ये असा प्रचार केला की, माझा भाऊ उच्च न्यायालयात न्यायाधीश असल्यामुळे कुलगुरू साहेब कार्यकारी प्राचार्य म्हणून माझीच नियुक्ती करणार आहेत. २२ जून २०२६ रोजी डॉ. आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीच्या विधिवत बोलाविण्यात आलेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत भन्ते ससाई यांना अध्यक्ष व विश्वस्तपदावरून पदमुक्त करण्यात आले असल्यामुळे त्यांच्या वतीने अथवा त्यांच्या निर्देशानुसार पाठविण्यात आलेले कोणतेही प्रस्ताव, शिफारसी, निवेदने अथवा विधाने यांना कोणतेही कायदेशीर अधिष्ठान किंवा वैधता नाही.

नव्याने निवडून आलेल्या विश्वस्त मंडळाने डॉ. भुवनेश्वरी मेहरे यांची प्राचार्य म्हणून शिफारस विद्यापीठाकडे पाठविली आहे. त्यांना विद्यापीठाची मान्यता एप्रिल २०२७ पर्यंत वैध असून, विधिसंमतपणे निवडून आलेल्या विश्वस्त मंडळाचा प्रस्ताव सध्या विद्यापीठाच्या सक्रिय विचाराधीन आहे.

त्यामुळे भन्ते ससाई यांनी विद्यापीठाविरोधात केलेले आरोप पूर्णपणे खोटे, दिशाभूल करणारे आणि समाजामध्ये चुकीची माहिती पसरविण्याच्या उद्देशाने केलेले आहेत. तसेच विद्यापीठाची प्रतिमा मलिन करण्याचा हा प्रयत्न आहे. प्रसारमाध्यमांनी अशी बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी स्मारक समितीच्या विधिसंमत निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांकडून वस्तुस्थितीची शहानिशा करणे अपेक्षित होते. दुर्दैवाने तसे न झाल्यामुळे चुकीची व दिशाभूल करणारी माहिती जनतेपर्यंत पोहोचली.

डॉ. आंबेडकर स्मारक समिती सर्व नागरिकांना आवाहन करते की, अशा खोट्या प्रचाराला किंवा बिनबुडाच्या विधानांना बळी पडू नये. समिती कायद्याचे पालन, पारदर्शक प्रशासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमीचे सुयोग्य व नियमबद्ध व्यवस्थापन करण्यास कटिबद्ध आहे असे विलास गजघाटे, अध्यक्ष, प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी, नागपूर यांनी सांगितले.

## महत्वाच्या बातम्या

### हिंगोली जिल्ह्याला पुन्हा भूकंपाचा धक्का

**हिंगोली :** हिंगोली जिल्ह्याला पुन्हा एकदा भूकंपाचा धक्का बसला आहे. आज(दि.११) सकाळी ११:२६ वाजण्याच्या सुमारास जिल्ह्याला भूकंपाचे हादरे जाणवले. या भूकंपाचा केंद्रबिंदू औंढा नागनाथ तालुक्यातील 'वसई' येथे असून, त्याची खोली ५ किलोमीटर असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.



जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून भूकंपाचे धक्के सातत्याने जाणवत आहेत. वसमत तालुक्यातील 'पांगरा शिंदे' येथे गेल्या आठ वर्षांपासून भूकंपाचे धक्के बसत असून, या धक्क्यांमुळे गावकरी दहशतीखाली आहेत. याआधी ८ जुलै रोजी मध्यरात्री जिल्हाभरात भूकंपाचे चार मोठे धक्के जाणवले होते, त्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्या चारही भूकंपांचा केंद्रबिंदू वसमत तालुक्यातील 'पांगरा शिंदे' आणि औंढा नागनाथ तालुक्यातील 'काकडधाबा' परिसरात होता. विशेष म्हणजे, मागील काही वर्षांतील सर्वात मोठा ४.६ रिश्टर स्केलचा भूकंप ८ जुलैला नोंदवला गेला होता.

जिल्ह्यातील नागरिक या धक्क्यांतून सावरत नाहीत तोच शनिवारी सकाळी ३.५ रिश्टर स्केलच्या तीव्रतेचा भूकंप झाला. पांगरा शिंदे, काकडधाबा आणि आता वसई येथे केंद्रबिंदू नोंदवल्या गेल्याने, भूकंपाचा केंद्रबिंदू हळूहळू सरकत असल्याची भीती जिल्हावासियांमध्ये निर्माण झाली आहे. दरम्यान, शनिवारी झालेल्या या भूकंपामुळे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. नागरिकांनी घाबरून न जाता अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### राज्यातील १४ हजार ग्रामपंचायतींनी थकवली तब्बल ७०० कोटींची बिले

**कोल्हापूर :** राज्यातील प्रशासक असलेल्या १४ हजार ग्रामपंचायतींनी अदा करावयाची सुमारे ७०० कोटी रुपयांची बिले थकली आहेत. शासनानेच मागितलेल्या माहितीतून हा मोठा आकडा समोर आला असून, माजी सरपंच प्रशासक असले तरी त्यांना फारसे आर्थिक अधिकार नसल्याने गावगाड्यातील कामेच ठप्प झाली आहेत. यावर शासनाने तातडीने हस्तक्षेप करत उपाययोजना करण्याची गरज आहे. एकट्या कोल्हापूर जिल्ह्यात २५ कोटींची बिले थकली आहेत.




या मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर माजी सरपंच आणि सदस्य असलेल्या प्रशासकीय समितीला काम करण्याचे अधिकार देण्यात आले. परंतु यानंतर न्यायालयात याचिका दाखल झाली आणि फक्त कर्मचाऱ्यांचे पगार आणि वीजबिलासारख्या रकमा देण्याचे अधिकार प्रशासक सरपंचांना देण्यात आले.

परंतु या दोन्हीशिवाय आणखी बरीच कामे रोज ग्रामपंचायतींना करावी लागत असल्याने सध्या केवळ उधारीवर कामकाज सुरू आहे. सरपंच आणि सदस्य असताना ग्रामपंचायतींना जो खर्च करावा लागत होता, तोच खर्च आता प्रशासक असतानाही करावा लागत आहे. परंतु या खर्चावरच मर्यादा घालण्यात आल्याने ग्रामपंचायत अधिकाऱ्यांसह सर्वच जण संभ्रमावस्थेत आहेत.

अनेक ग्रामपंचायती पावसाळ्यातील कामांसाठी कर्मचाऱ्यांना रेनकोट, बूट आणि हँडग्लोव्हज देतात. परंतु खर्चाचा अधिकार नसल्याने यावेळी हे साहित्यही कर्मचाऱ्यांना मिळालेले नाही. पिण्याच्या पाइपलाइनमधील मोठी गळती, टीसीएल पावडरसारखे साहित्य सातत्याने खरेदी करावे लागत असताना त्यावर बंधने आणण्यात आली आहेत.

ग्रामपंचायतींच्या छोट्या-मोठ्या वस्तूंचा पुरवठा करणारे, विविध कामांचा ठेका घेतलेले ठेकेदार या प्रशासकीय कारकिर्दीत हवालदिल झाले आहेत. पगार आणि वीजबिलाव्यतिरिक्त बिले अदा करण्यावर बंधने असल्याने गावपातळीवर नाराजी आहे.

## नॅशनल कॉन्फरन्सच्या आमदारांना 30 कोटींची ऑफर

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी आज शनिवारी (11 जुलै) भाजपावर गंभीर आरोप केले. त्यांनी म्हटलं की, त्यांचे सरकार अस्थिर करण्यासाठी नॅशनल कॉन्फरन्समध्ये (NC) फूट पाडण्याचे प्रयत्न केले जात आहेत. भाजपा आपल्या नॅशनल कॉन्फरन्स पक्षाच्या आमदारांना पैसे आणि पदे देऊ करून त्यांना आमिष दाखवण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावाही त्यांनी केला.



मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला नेमकं काय म्हणाले? : आपल्या आजी अकबर जहाँ यांच्या 26 व्या स्मृतिदिनानिमित्त हजरतबल येथे आयोजित कार्यकर्त्यांच्या मेळाव्याला संबोधित करताना ओमर अब्दुल्ला यांनी सांगितलं की, नॅशनल कॉन्फरन्स पक्ष फोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यांनी आरोप केला की, जेव्हा पैसा आणि मंत्रिपदांचे आमिष कुचकामी ठरलं, तेव्हा आता आमदारांना राज्याचा दर्जा पुन्हा बहाल करण्याबाबत आश्वासनं दिली जात आहेत. जम्मू भागातील नॅशनल कॉन्फरन्सच्या एका आमदारानं आपल्याला सांगितलं की, पक्ष बदलण्याच्या बदल्यात त्यांना 20 ते 30 कोटी रुपये, मंत्रिपद आणि राज्याचा दर्जा पुन्हा बहाल करण्याचं आमिष दाखवण्यात आलं होतं, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला.

'जम्मू-काश्मीरमध्ये चोरट्या मार्गानं सत्ता मिळवता येत नाही' : ओमर अब्दुल्ला यांनी सांगितलं की, नॅशनल कॉन्फरन्सचे आमदार आपल्या तत्त्वांशी तडजोड करणार नाहीत आणि कोणत्याही परिस्थितीत स्वतःची विक्री करणार नाहीत. ते म्हणाले की, पक्षाचे नेते जनता आणि ईश्वर यांच्याप्रती उत्तरदायी आहेत. भाजपावर निशाणा साधत मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं की, जम्मू-काश्मीरमध्ये चोरट्या मार्गानं सत्ता मिळवता येत नाही. जनतेनं ज्यांना जी भूमिका दिली आहे, त्यातच सर्वांनी समाधानी राहिलं पाहिजे आणि सत्तेतील बदल केवळ लोकशाही मार्गानंच शक्य आहे, असं त्यांनी ठामपणे सांगितलं.



## पुण्यात सूर्याभोवती गोल रिंगणाचे अद्भुत दर्शन

**पुणे:** निसर्गाची किमया पुणेकरांना शनिवारी दुपारच्या सुमारास आकाशामध्ये अनुभवायला मिळाली. आकाशात सूर्याभोवती उमटलेल्या आकर्षक गोल रिंगण प्रकाशवलयाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. अनेकांनी हा दुर्मिळ निसर्गाविष्कार आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात टिपत सोशल मीडियावरही शेअर केला. त्यामुळे सोशल मीडियावर सूर्याच्या फोटोचा पूरच पहायला मिळाला. सूर्याभोवती दिसणारे हे प्रकाशवलय किंवा 'खळे' हा वातावरणातील नैसर्गिक प्रक्रियेचा परिणाम असल्याची माहिती विज्ञानाचे शिक्षक व्ही. व्ही. रामदासी यांनी दिली.

## भिक्षुणीच्या चिवराला हात लावल्याच्या घटनेचा तीव्र निषेध

### बजाजनगर पोलीस ठाण्यात तक्रार, कठोर कारवाईची मागणी

**नागपूर :** दीक्षाभूमीलगत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय परिसरात भिक्षुणी विशाखा यांच्या चिवराला एका महिलेने हात लावल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर बौद्ध समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेचा निषेध करत बौद्ध बांधवांनी बजाजनगर पोलीस ठाण्यात संबंधित महिलेविरुद्ध तक्रार दाखल करून कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.



भिक्षुणी विशाखा यांनी या प्रकरणी अधिकृत तक्रार नोंदविली असून, पोलिसांनी तक्रार स्वीकारून तपास सुरू केला आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, पोलिसांनी यापूर्वीही संबंधित महिलेविरुद्ध अशा स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त झाल्याची माहिती दिली असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणातील सर्व बाबींची चौकशी करून कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी आश्वासन दिले आहे.

बौद्ध समाजातील विविध संघटनांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला असून, भिक्षुणीच्या चिवराचा अपमान हा बौद्ध धार्मिक परंपरा व श्रद्धेवर आघात असल्याचे म्हटले आहे. दीक्षाभूमीसारख्या पवित्र स्थळालगत अशा प्रकारच्या घटना घडणे चिंताजनक असून, परिसरात शांतता, शिस्त आणि धार्मिक सन्मान अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला असून, पोलिसांकडून त्याचीही तपासणी केली जात आहे. तपासानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.

## राज्यात २.४५ कोटींचा 'ॲसिलॉक' औषधसाठा जप्त

**नागपूर :** रुग्ण, डॉक्टर आणि औषध विक्रेत्यांमध्ये गोंधळ निर्माण होऊन चुकीचे औषध वापरले जाण्याचा धोका लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाने राज्यात मोठी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली पुणे, नागपूर आणि भिवंडी येथील तब्बल २ कोटी ४५ लाख रुपयांचा ॲसिलॉक औषधांचा साठा जप्त करण्यात आला आहे. संबंधित कंपनीला हा संपूर्ण साठा बाजारातून तातडीने परत मागवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.




नियमित तपासणीत असे आढळले की, पूर्वी बाजारात उपलब्ध असलेल्या औषधामध्ये एक औषधी घटक वापरण्यात येत होता. मात्र त्याच नावात केवळ 'अधिक' हे चिन्ह जोडून बाजारात आणलेल्या नव्या औषधामध्ये पूर्णपणे वेगळा औषधी घटक वापरण्यात आला. तरीही औषधाचे नाव, वेष्टन आणि छपाई जवळपास पूर्वीसारखीच ठेवण्यात आली होती. त्यामुळे डॉक्टर, औषध विक्रेते आणि रुग्ण यांच्यात गोंधळ निर्माण होऊन चुकीचे औषध दिले जाण्याची शक्यता लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आली.

जुने आणि नवे औषध एकाच वेळी बाजारात उपलब्ध होते. दोन्ही औषधांच्या नावात अत्यल्प फरक असल्यामुळे डॉक्टर, औषध विक्रेते किंवा रुग्ण यांच्याकडून चुकीचे औषध दिले किंवा वापरले जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने ही गंभीर बाब मानून अन्न व औषध प्रशासनाने तातडीची प्रतिबंधात्मक कारवाई केली.

## व्हिएतनाममध्ये ३२ भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी बोट उलटली १५ पर्यटकांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** व्हिएतनामच्या फु क्वोक बेटाजवळ भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक बोट उलटल्याची माहिती मिळत आहे. या दुर्घटनेनंतर बचावकार्य सुरू करण्यात आले असून भारतीय दूतावासाने स्थानिक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून बचावकार्याची माहिती घेतली. व्हिएतनाममधील भारतीय दूतावासाने सांगितले की, ते परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात आहेत. दरम्यान दुर्घटनेत आतापर्यंत १५ पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती रॉयटर्स वृत्तसंस्थेने दिली आहे.



दूतावासाने एक्स अकाऊंटवरून या अपघाताची माहिती दिली. "काही तासांपूर्वी फु क्वोक बेटाजवळ अनेक भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक बोट उलटल्याची एक दुःखद घटना घडली आहे. घटनेचा तपशील मिळवला जात आहे. स्थानिक प्रशासन बचाव आणि शोध कार्य करत आहे", अशी माहिती पोस्टमध्ये देण्यात आली आहे. दरम्यान या घटनेशी संबंधित काही व्हिडीओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दरम्यान समुद्रात उलटलेली बोट दिसताच जवळच्या इतर पर्यटक बोटी तात्काळ मदतीसाठी घटनास्थळी धावून आल्या आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले. भारतीय दूतावासाने बाधित कुटुंबांना माहिती आणि मदत पुरवण्यासाठी हो चि मिन्ह शहरात एक नियंत्रण कक्षही स्थापन केला आहे.या पोस्टमध्ये दूतावासाने नमूद केल्यानुसार, बाधित कुटुंबांना मदत पुरवली जात आहे. तसेच नातेवाईकांनी संपर्क साधावा यासाठी काही फोन नंबरही एक्स पोस्टमध्ये शेअर करण्यात आले आहेत. आम्ही प्रत्येक मदतीसाठी आणि तुमच्या प्रश्नांसाठी उपलब्ध आहोत, असेही या मजकूरात नमूद केले आहे.

रजि. नं. महाराष्ट्र नाग. ८०२/२०१८ व ३६४७७/२०१९

बुध्द विहार समन्वय समिती
व्दारा संचालित
बुध्दीस्ट हेरीटेज ॲण्ड कल्चर कन्झर्वेशन कमिटी
आयोजित

भुवनेश्वर, नंदन कानन ललीतगीरी खंडगीरी, रत्नगीरी, उदयगीरी, धौलगीरी, शांतीस्तुप, कोणार्क सन टेंपल, नवग्रह टेंपल, चंद्रभागा, समुद्र बीच, जगन्नाथ टेंपल, गोल्डन बीच, चील्का लेक, पूरी धम्मसहल
(टायगर सफारी, लॉयन सफारी, बोटींग, बियर सफारी समाविष्ट)



गुरुवार दि. २४/९/२०२६ ते २९/९/२०२६ एकूण ६ दिवस ५ रात्र

दिनांक ८/९/२०२६ पर्यंत सहलीचा प्रवेश रद्द करता येईल. त्यानंतर रद्द केल्यास रक्कम परत मिळणार नाही.

सहलीसाठी देणगी रक्कम
१) प्रति व्यक्ती रु. १२१००/- (स्लीपर कोच प्रवास)
२) प्रति व्यक्ती रु.१४०००/- (ए.सी. 3 Tier प्रवास)
टिप : स्वत: टिकीट काढणाऱ्या व्यक्तीस रु. ११०००/- फक्त

Bank of India
Relationship beyond banking
BUDDHA VIHAR SAMANVAY SAMITI PALI BHASHA
SCAN & PAY
boim-874001501414@boi
रक्कम भरल्यानंतर Screen Shot पाठवावा

अटी व नियम :
ही सहल बौद्ध पर्यटन स्थळे पाहण्याच्या उद्देशाने काढण्यात येत आहे. पर्यटकास खालील नियम बंधनकारक राहातील.
१) संपुर्ण प्रवासात मांसाहार व मद्यपान वर्ज्य राहील. २) पुर्ण रक्कम भरल्याशिवाय प्रवेश निश्चीत होणार नाही.
३) या प्रवासात सहकार्याच्या भावनेने प्रत्येकानी यावे. ४) रेल्वेतील प्रवासात समिती कडून जेवण मिळणार नाही.
५) क्यु.आर. कोड नी किंवा प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत (दुपारी ४ ते ५.३० वाजेपर्यंत) सम्मक बुध्द विहार जुनी वस्ती खामला, येथे केंद्रीय कार्यालयात रक्कम जमा करता येईल. • ऑनलाईन रक्कम भरल्यानंतर त्यांचा स्किन शॉट पाठवावा. ६) २ महिन अगोदर (२४.७.२०२६ ला) आरक्षण सुरुवात होईल त्यामुळे सर्वांनी २०/७/२०२६ पर्यंत नगद रक्कम जमा करावी. ७) ५ दिवसाच्या प्रवासात जेवढे जास्ती जास्त स्थळ पाहता येतील तेवढे दाखविण्याचा त्याबद्दल माहिती गाईड कडून सांगण्याचा प्रयत्न केल्या जाईल.

टिम मॅनेजर :- अशोकभाऊ सरस्वती बौद्ध मो. ८५३०९८०७४१

• संपर्कासाठी क्षेत्रानुसार प्रतिनिधी •
• दक्षिण-पश्चिम नागपूर - हिरामण वाघमारे - 9890181834, दिलीप बागडे - 8308001214, धेनुत्तम बोंबर्डे -9561561788 गौतम मोडक - 9423634984 • दक्षिण नागपूर- सिद्धार्थ खोब्रागडे - 9423122375, देवागीनी कांबळे - 9766916610,सुचिता बुरबुरे - 8459254940 • पश्चिम नागपूर- नरेश मेश्राम - 9423404861,तनुजा झिलपे - 8600350838, प्रमिला सोनवणे -8668712023 • मध्य नागपूर - मायाताई जामगडे- 9371592735, नलीनी वाळके- 9021043047 दामोधर लोखंडे- 7276081150 • उत्तर नागपूर - कांताप्रसाद रामटेके -8055383807, एम.व्ही. नाईक-9422818873 • पूर्व नागपूर-वामनराव निल - 9423680543, विश्वनाथ लोखंडे -8788261947

अधिक माहिती साठी संपर्क : ईजि. ए.के. पाटील -7972987584 प्रा.आनंद वासनिक -9822238757

12 July 2026 page 03-1_Layout 1 7/11/2026 6:24 PM Page 1



“ स्वप्नं मोठी असतील तर संघर्षही मोठा करावा लागतो... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# समतेचा बुलंद आवाज जिंदाबाद

२९ जून १९२८ हा भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'समता' हे विचारप्रधान वृत्तपत्र सुरू केले. हे केवळ वृत्तपत्र नव्हते, तर सामाजिक समता, न्याय आणि बंधुतेच्या लढ्याचे प्रभावी वैचारिक शस्त्र होते. वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाला विचारांची दिशा देण्याचे, अन्यायाविरुद्ध निर्भीड आवाज उठविण्याचे आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देण्याचे ऐतिहासिक कार्य समताने केले. आज त्याच्या प्रकाशनाला ९९ वर्षे पूर्ण होत असताना त्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात लेखणीला परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता आणि प्रबुद्ध भारत या वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्नांवर परखड भूमिका मांडली. त्यांच्या दृष्टीने वृत्तपत्र म्हणजे केवळ बातम्यांचे माध्यम नव्हते, तर समाजाला विचार देणारे, अंधश्रद्धा व विषमता यांच्यावर प्रहार करणारे आणि लोकांना संघटित करणारे प्रभावी व्यासपीठ होते. आज समताचे उपलब्ध सर्व अंक एकत्र करून समता ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे. हा ग्रंथ ऐतिहासिक दस्तऐवज तर आहेच, पण भावी पिढ्यांसाठी वैचारिक मार्गदर्शकही आहे. त्या काळातील सामाजिक परिस्थिती, संघर्ष आणि समतेच्या चळवळीचे दर्शन या ग्रंथातून घडते. समता ही केवळ एक संकल्पना नसून मानवतेचा मूलभूत आधार आहे. जात, धर्म, लिंग, भाषा किंवा आर्थिक स्थितीच्या आधारे भेदभाव असताना खरी



लोकशाही निर्माण होऊ शकत नाही. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीला राजकीय लोकशाहीचा पाया मानले. सामाजिक समता नसल्यास संविधानातील मूल्येही पूर्णत्वाला जाऊ शकत नाहीत. जशी घराची नियमित स्वच्छता आवश्यक असते, शेतातील तण वेळोवेळी काढावे लागते, त्याचप्रमाणे समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, विषमता आणि अन्याय यांचेही सातत्याने निर्मूलन करावे लागते. हे कार्य विचारांच्या माध्यमातूनच शक्य होते. त्यामुळे विचारप्रधान पत्रकारितेचे महत्त्व आजच्या सोशल मीडियाच्या आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीच्या युगात अधिक वाढले आहे. समतेचा संघर्ष हा एका दिवसाचा किंवा एका पिढीचा नव्हता. भगवान बुद्धांनी जन्माधारित श्रेष्ठत्व नाकारून प्रज्ञा, करुणा आणि समतेवर आधारित समाजाची कल्पना मांडली. महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या विचाराला व्यापक सामाजिक चळवळीचे स्वरूप दिले. त्यांच्या कार्यामुळे समतेची संकल्पना भारतीय समाजजीवनाच्या केंद्रस्थानी आली. समतेचा अर्थ सर्वांना सारखी वागणूक देणे एवढाच नसून, ज्यांना इतिहासाने वंचित ठेवले त्यांना समान संधी उपलब्ध करून देणे हा त्याचा गाभा आहे. आरक्षणाची संकल्पना याच सामाजिक न्यायाच्या तत्त्वज्ञानातून निर्माण झाली. मागासलेल्या घटकांना विशेष संधी देणे म्हणजे विषमता नव्हे, तर खरी समता प्रस्थापित करण्याचा मार्ग आहे. समाज समता संघाच्या कार्यात विविध क्षेत्रांतील अनेक प्रबुद्ध व्यक्तींनी योगदान दिले. श्रीधर टिळक यांच्यासारख्या व्यक्तींनीही या चळवळीत सहभाग घेतला. यावरून समतेच्या विचाराने समाजातील विविध स्तरांना जोडण्याचे ऐतिहासिक कार्य केले होते, हे स्पष्ट होते. समाज परिवर्तनासाठी विचारांबरोबर आर्थिक बळही आवश्यक असते, याची जाणीव डॉ. बाबासाहेबांना होती. म्हणूनच त्यांनी समता सहाय्यक निधी उभारण्याचे आवाहन केले. त्या काळी वृत्तपत्र चालविणे अत्यंत कठीण होते. जाहिराती नव्हत्या, आर्थिक साधने मर्यादित होती; तरीही समाजाच्या लोकसहभागातून निधी उभारण्याचा आदर्श त्यांनी घालून दिला. एस. एस. गुप्ते, सी. ना. शिवतरकर, जी. आर. प्रधान, भा. वि. प्रधान, स. बा. शारंगपाणी, ल. र. शिंदे, अ. वि. चित्रे यांसारख्या अनेक दानशूर व्यक्तींनी या कार्यासाठी उदार सहकार्य केले. आज या इतिहासातून महत्त्वाचा धडा घेण्याची गरज आहे. समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करणाऱ्या संस्था, संशोधन केंद्रे, वाचनालये, प्रकाशन संस्था, विद्यार्थी वसतिगृहे आणि शैक्षणिक उपक्रम यांना सक्षम आर्थिक आधार मिळाला पाहिजे. समाजाने स्वतःच्या विकासासाठी निधी उभारण्याची परंपरा पुन्हा निर्माण केली पाहिजे. आज आपण चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष, समता सैनिक दल शताब्दी वर्ष, बहिष्कृत भारत शताब्दी वर्ष आणि समताच्या ९९ व्या वर्धापन वर्षाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. हा काळ केवळ स्मरणाचा नाही, तर आत्मपरीक्षणाचाही आहे. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेचा संदेश आपण कितपत आचरणात आणला, याचा प्रामाणिक विचार करण्याची वेळ आली आहे. आज शिक्षणाचे व्यापारीकरण, बेरोजगारी, वाढती आर्थिक विषमता, जातीभेदाचे बदलते स्वरूप, अंधश्रद्धा, सामाजिक माध्यमांवरील दिशाभूल करणारा प्रचार आणि संविधानिक मूल्यांवरील वाढते आव्हान या गंभीर समस्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत समतासारख्या विचारप्रधान साहित्याचा अभ्यास अधिक आवश्यक ठरतो. समतेचा संघर्ष आजही संपलेला नाही. तो केवळ आंदोलनांपुरता मर्यादित नसून शिक्षण, संशोधन, पत्रकारिता, उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, कला आणि सामाजिक बांधिलकी अशा सर्व क्षेत्रांत प्रतिबिंबित झाला पाहिजे. समतामूलक समाज घडविण्यासाठी आपण सामाजिकदृष्ट्या संवेदनशील, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि वैचारिकदृष्ट्या परिपक्व होणे आवश्यक आहे. प्रत्येक घरात पुस्तकांचे कपाट असावे, मुलांच्या हातात चांगली पुस्तके असावीत, प्रत्येक गावात वाचनालय असावे आणि प्रत्येक तरुणाने डॉ. बाबासाहेबांचे साहित्य तसेच समता ग्रंथ अभ्यासला पाहिजे. विचारांची परंपरा जिवंत राहिली तरच समाजाची प्रगती टिकून राहील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' ही त्रिसूत्री आजही तितकीच प्रेरणादायी आहे. समता ही कोणत्याही एका समाजाची नव्हे, तर संपूर्ण मानवजातीच्या मुक्तीची संकल्पना आहे. २९ जून हा दिवस केवळ एका वृत्तपत्राचा वर्धापनदिन नसून सामाजिक न्याय, विवेक आणि समतेच्या वैचारिक क्रांतीचे स्मरण करून देणारा दिवस आहे. या निमित्ताने आपण आपल्या पूर्वजांच्या संघर्षाचे स्मरण करूया, वर्तमानातील आव्हानांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करूया आणि संविधाननिष्ठ, वैज्ञानिक, समतामूलक भारत घडविण्याचा निर्धार करूया. समताचे वाचन म्हणजे केवळ इतिहास समजून घेणे नव्हे, तर वर्तमानाचे आकलन करून भविष्य घडविण्याची प्रेरणा घेणे होय. हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाहिलेला खरा अभिवादनाचा मान ठरेल.●●



विलास गजभिये
मो. 9421588901

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देशद्रोही

'दिसते तसं नसते' अशी एक सुप्रसिद्ध म्हण आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक ढोंगी असतात. जे असतात ते तसे दिसत नाहीत. चांगुलपणा, ईमानदारी, लोकसेवक असे सोंग घेऊन ते लोकांसमोर मिरवीत असतात. लोक जेव्हा विश्वास ठेवतात तेव्हा ते आपला रंग दाखवतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही अशीच गुन्हेगार, बेईमान आणि देशद्रोही संघटना आहे. महात्मा गांधींच्या खुनानंतर लोकांना आता हळूहळू संघाचे खरे रूप दिसू लागले आहे. देशद्रोह म्हणजे देशाविरुद्ध केलेले षडयंत्र. भारत देश सातशे वर्षे परकियांचा राजकीय गुलाम होता. मुघल, शक, हुन, पोर्तुगीज, डच आणि ब्रिटिश या लोकांनी भारतावर राज्य केले. संघ ज्या ब्राम्हणांचा ब्राम्हणांसाठी ब्राम्हणांकडून निर्माण केला तो ब्राम्हण नेहमीच परकीय शासकांसोबत सत्ता भोगत होता. राज्य कुणीही करा केवळ आमचे समाजात जे स्थान आहे त्याला कोणत्याही शासनाने धक्का लाऊ नये. तुम्ही देश लुटा आणि आम्हीही लुटतो ही त्यांची मानसिकता. ब्राम्हण वर्ण भारतातील समाजात सर्वापेक्षा उच्च आहेत आणि ते तसेच राहिले पाहिजे. ब्राह्मणांचे जे गुलाम आहेत ते शूद्र आणि अतिशूद्र ते त्यांच्या गुलामितच राहिले पाहिजे. ते बुद्धी, धन, सत्ता, शस्त्र यापासून वंचितच राहिले पाहिजे. राज्यकर्त्यांचे हाताखाली ब्राम्हण असेल तर कोणताही राज्यकर्ता ब्राम्हणाला चालेल ही ब्राम्हणांची नीती राहिली. म्हणून भारताचे स्वातंत्र्य लढ्यात संघ कधीच सामील झाला नाही. जेव्हा मुघल शासक समाजात समता आणू लागलेत, शूद्र-अतिशूद्र वर्णाचे लोकांना मुसलमान धर्मात घेऊ लागले तेव्हा ब्राम्हण मुघलांच्या विरोधात जातात. ब्रिटिश सरकारने समाज सुधारणा सुरू केल्यात तेव्हा टिळकांसारखे ब्राम्हण नेते ब्रिटिशांचे विरोधात उभे झाले. गांधीजींचे नेतृत्व जेव्हा स्वातंत्र्य लढ्याला प्राप्त झाले आणि त्यांनी अस्पृश्यता निवारण सुरू केले. तसेच तेली, माळी, कुणबी अशा शूद्र वर्णाचे लोकांना स्वातंत्र्य लढ्यात आणू लागले तेव्हा ब्राम्हण स्वातंत्र्य आंदोलनातून



बाजूला होतात आणि शंभर वर्षांपूर्वी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या नावाने वंशवादी चळवळ सुरू करतात. इटलीचे मुसोलिनी आणि जर्मनीचे ॲडॉल्फ हिटलर यांना ते आपले आदर्श मानतात. आजही ब्राम्हण हस्तक श्री. नरेंद्र मोदी इजरायलला आपला पितृ देश मानतात. कारण नरभक्षी नेत्यांन्याहू हा वंशवादी आणि युद्धखोर आहे. सारे जग त्याला नाकारतात मात्र संघ आणि भाजप त्याला बाप मानतात. आतापर्यंत भारत पॅलेस्टाईन आणि इराण समर्थक होता. आपसात पारंपरिक मैत्री होती. आज ती नीती नाही राहिली. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मोदी हे त्यांचे मित्र इस्त्रायली प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यांन्याहू यांना भेटून येतात आणि २८ फेब्रुवारी रोजी शिया मुस्लिम धर्मगुरु आणि इराणी शासक खोमेनी यांना इस्त्रायल ठार मारतात. दोघेही मुस्लिम वंश संहार करणारे आहेत. त्यानंतर भारत आंतरराष्ट्रीय पातळीवर अलगथलग पडतो, हा भारताला कमजोर करणारी निती देशद्रोहच म्हटले पाहिजे. साम्राज्यवादी लोक भारताचे मित्र होऊ शकत नाही. अमेरिका लोकशाहीचे ढोल जरी पिटत असला तरी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प मात्र साम्राज्यवादी आहे. इतर देशांना आपल्या गुलामीत ठेवणे आज जगाला मात्र मान्य नाही. व्हेनेझुएला असाच गिळंकृत केला. आता ग्रीनलँड गिळंकृत कसा केला जाईल हे प्रयत्न सुरू आहेत. मध्य पूर्व आशियातील खाडी देश अमेरिकन साम्राज्यवादी शासकांनी आपल्या अंकित करण्यासाठी इराण युद्ध लादले. इराक असाच बेचिराख केला. त्या अमेरिकेची गुप्तचर संघटना सीआयए चे एजेंट जगभर त्यांनी निर्माण केले आहे. संघ आणि मोदी देखील त्यांचे एजंट असल्याचे तज्ञ लोक बोलू लागले आहेत. भारताला अस्थिर करण्यासाठी अमेरिका आपल्या एजंट मार्फत प्रयत्न करतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गेल्या १०० वर्षांपासून तेच करीत आली आहे. हा देशद्रोहच आहे. जगातील कोणताही स्वतंत्र असलेला देश प्रबळ होता कामा नये. म्हणून त्या देशामध्ये वंशवादी किंवा धर्मांध देशद्रोही संघटना निर्माण करण्यासाठी रसद पुरविण्याचे काम एजन्टमार्फत अमेरिका करते. भारताची फाळणी होण्याआधी बॅरिस्टर जिना ते काम करीत होते. फाळणीनंतर भारतात ते काम संघ भाजप करीत आहे. म्हणून भाजपची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिका आतून मदत करीत असते. अमेरिकेच्या हिताला धक्का लागला तरच तेथे रिजिम चेंज करण्यात येते अन्यथा नाही. संघ जर अमेरिकी गुप्तचर संघटनेचा एजंट असेल तर तो देशद्रोहीच म्हटल्या जावा. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय ही लोकशाहीची स्तंभ आहेत. संघ आणि भाजप नेहमीच या चार लोकशाही मूल्याविरुद्ध काम करीत होता आणि आहे. जातीय आणि धार्मिक दंगल घडऊन आणणे हे संघ भाजपचे कुकृत्य आहेत हे लपून राहिले नाही. मणिपूर का जाळल्या जात आहे? कारण तेथील आदिवासी ख्रिश्चन आहेत. लडाखी लोकनेते सोनम वांगचुक यांना गुन्हा नसताना तुरुंगात का टाकले? कारण ते आदिवासी आणि बौद्ध आहेत. यामुळे भारताचे ऐक्य धोक्यात येत आहे. भारताची एकता नष्ट करणे हे देशद्रोही कृती आहे. असे काम जर संघ भाजप करीत असेल तर ते देशद्रोहीच आहेत. सामाजिक विषमतेचे बळी जे दलीत आदिवासी आणि ओबीसी ठरलेत त्यांचा स्वतंत्र भारतात शासन प्रशासनात सहभाग असावा म्हणून त्यांना आरक्षण देण्यात आले. परंतु संघ भाजप नेहमीच आरक्षण विरोधी राहत आलेला आहे. शूद्र, अतिशूद्र वर्णाचे लोकांना प्रतिनिधित्व देणे हे संघाला मान्य नाही. कारण ते मनुस्मृतीचे विरोधात आहे.उपवर्गीकरण हे आरक्षण नष्ट करण्यासाठी आणि दलितांचे विभाजन करण्यासाठी रचलेले षडयंत्र आहे. संघी एजंट तसे सर्वच पक्षात त्यांनी पेरलेले आहेत. मार्क्सवादी, आंबेडकरवादी, समाजवादी आणि कॉंग्रेस हे कुणीच मुक्त नाहीत. ही संघी उधळी सर्वत्र लागली आहे. ते किडे वेळप्रसंगी उघड होतात. आरक्षणाला आणि अन्याय-अत्याचार प्रतिबंधक कायद्याचा विरोध करणे हा देशद्रोह आहे. संघ आणि भाजप हे देशद्रोही काम सुरुवातीपासूनच करत आला आहे. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, बुद्धी प्रामाण्यवाद याचा संविधान स्वीकार करते. म्हणून संघ आणि भाजप संविधानाचा विरोध करते. जसेही अटलबिहारी वाजपेयी प्रधानमंत्री झाले तसे त्यांनी संविधान समीक्षेला हात घातला. तो देशद्रोहच होता. गुन्हेगारी राजकारणात पारंगत असलेले मोदी-शहा यांनी निवडणूक आयोग, न्याय व्यवस्था, माध्यमे आणि प्रशासन ज्याप्रकारे संविधान विरोधी करून लोकशाहीला नख लावण्यासाठी वापरले तो देशद्रोहच आहे. एकंदरीत आज देशात अराजक निर्माण झाले आहे. लोक भयग्रस्त झाले आहेत. जनआंदोलन दुर्लक्षित करण्यात आले आहे. जो कोणी भाजप आणि संघ सरकारच्या धोरणाचा विरोध करत असेल तर तो कसा देशद्रोही आहे हे बिंबवण्याचा प्रयत्न हे संघ भाजप चे लोक करीत आहेत. राममंदिर चंदा चोरांना न पकडता ज्यांनी ही चोरी उघड केली त्यांना हे सरकार हिंदू आणि राम विरोधी म्हणत आहेत. चोरांच्या उलट्या बोंबा असा हा देशद्रोही प्रकार आहे. देशातील जागृत लोकांनी देश आणि देशाचे स्वातंत्र्य रक्षणासाठी संवैधानिक मार्गाने या देशद्रोही संघटना विरुद्ध जागृती केली पाहिजे. ती राष्ट्रभक्ती आहे. आपण संख्येनी कमी आहोत की जास्त हा विचार करण्याची गरज नाही. आपण कोणत्या संकटात पडू हा देखील आज विचार करण्याची गरज नाही. कारण उद्या आपण सर्वच जण संकटात येणार आहोत. आज बोलण्याची लिहिण्याची संधी आहे. उद्या ती राहीलच याची खात्री नाही. म्हणून आहे तोपर्यंत जागृती केली पाहिजे. २०२९ मध्ये जर हे नरभक्षी सत्तेत आले तर मग त्यानंतर आपण ही जागृती करू शकणार की नाही याची खात्री नाही. आपल्या देशासाठी, देशाचे स्वातंत्र्य रक्षणासाठी, संवैधानिक हक्कासाठी लढत राहू या.●●

लेखांक163



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

# जगणं तुझं माझं

जन्माला आले म्हणजे प्रत्येकाला जगायचे म्हणजे सर्कस करावी लागते. पण आपण जगताना इतरांचा कधी विचार करतो का? तर बिलकुल नाही. पण समोरचा माणूस जगण्यासाठी धडपड करतो आहे हे उमगले की आयुष्याचे खरे गणित कळते. कुणी पोटावर हात मारत जगते तर कुणी पोट भरण्यासाठी जगते. लग्न झाल्यावर नववधूला घेऊन आपल्या कामाच्या ठिकाणी गावाला घेऊन गेलो की आपण आपल्या मार्गाला लागतो. पत्नी म्हणून आलेली नवशिकी बायको ही संसाराचे धडे घेऊ लागली की तिला प्रथम बचत कशी करून संसाराला हातभार लावू याची खंत सतावत असते मग ती आपली जुनी कापडे साड्या कुणा कोमट्याला विकून भांडी घेत असल्याचे ऐकून होतो. माझेही लग्न झाल्याने मीही तसेच काहीसे गावाकडे गेलो. गुपगुमान नोकरी इमाने इतवारे करीत असताना मी घरी पैसे दिलेले नसतानाही नवीनच घरात आलेली भांडी पाहून मनोमन सुखावलोही. पण त्या भांड्याच्या मागचे सत्य कळल्यानंतर मनावर झालेल्या जखमा आणि यातना अजूनही विसरलेलो नाही आणि न राहवून सहज सौं ना विचारूनच घेतले. तिने सांगितले, काल सकाळी कोमटी बाई आली होती मला चार शब्द आणि दोन साड्या देऊन हीं भांडी घेतली. हो का म्हणून मी मान डोलावली आणि विसरूनही गेलो दुसऱ्या दिवशी मुकाट्याने जेवणाचा डबा उचलला आणि सायकलीला टांग मारून कामावर गेलो. कामे आटोपून निवांतपणे रात्री पोहोचलो आणि बघतो तर काय, काल दिसणारी भांडी आज गायब होती. म्हणून सौं ला विचारूनच घेतले आणि तिने कथन केलेली गोष्ट ऐकून रात्रभर झोपच आली नाही. त्याचे झाले असे की भांडी देऊन गेलेली कोमटी बाई पुन्हा दुसरा दिवशी आली आणि भांडी परत मागत कपडे परत करू लागली. कारण विचारले तर तिने तिचे अंगावरील वळ दाखवले आणि धसाढसा रडू लागली. इतक्या कमी कपड्यात इतकी भांडी का दिली म्हणून नवऱ्याने तिला मार मार मारले होते. आता तिचीही चूक नव्हती. पोटासाठी ती कपड्यावर भांडी देत होती तर पत्नी हीं नव्या संसाराचे धडे घेताना भांडी जुळवत होती. पोटासाठी भांडी विकणारी ती महिला आजही डोळ्यासमोरून जात नाही. पण पोट कसे भरायचे या चिंतेत असणाऱ्या त्या कोमटी बाईने अजून किती भांडी विकली असतील आणि पतिकडून किती मार खाल्ला असेल याचा विचार केला तर अंगावर काटा येतो. त्यानंतर कधी कोमटीला कपडे देऊन भांडी घेतली नाही. पण माणसांच्या जगण्याच्या संघर्षातील हीं विषमता कधी दूर होईल याचा विचार करीत आयुष्याची साठी कधी उलटून गेली ती अजूनही कळले नाही आयुष्य म्हणजे काय तर नुसताच संघर्ष पण कुणाच्या झोळीत संघर्ष करून ही संसारात अंगावर उमटणारे वळ आणि कुणाच्या नशिबात लढता लढता असे ही जगणे. त्या माऊलीला रात्रीच्या दोन घासासाठी करावा लागणारा संघर्ष तिचे जगणे आणि माझे जगणे पोटाच्या खळगी भरण्यासाठी पण जीवन संगिनीला भांडी विकायला पाठवणारा नवरा घरी बसून हिशेब घेताना मारहाण करतो म्हटल्यावर पुरुष प्रधान संस्कृतीतला हा किस्सा प्रत्येक हृदय असणाऱ्या माणसाला पिळवटून टाकते. स्त्री पुरुष एका रथाची दोन चाके असतात असे म्हणणाऱ्या समाजात अशा असंख्य पोटासाठी हाडाची काड करणाऱ्या लोकांना आपण मदत केलीच पाहिजे. परंतु त्याचबरोबर त्यांना समानतेने कसे वागवता येईल याचा समाजाला विचार करण्याची गरज आहे. सकाळी भांडी घेऊन वणवण भटकणाऱ्या त्या कोमटी महिलेचे जगणे आणि आपल्या समाजातल्या पोटासाठी संघर्ष करणाऱ्या महिला त्यांची मुले याचा हीं विचार आपण केला पाहिजे हो की नाही! माझे जगणं पांढरपेशी असले तरी आपणही रात्र पहाट करून जगलो असलो तरी आपला संघर्ष त्या कोमटी महिलेच्या जीवन जगण्याच्या संघर्षापुढे काहीच नाही याची जाणीव मात्र मला आयुष्यभर होत राहिली. ●●





शफीक शेख
मो. 9420588366

# कृतज्ञता



शिल्पा मोठ्या सुपर शॉप समोर कॉलेजमधून घरी परतत असतांना एक क्षण थांबली. विचार केला काही काम मिळते का म्हणून विचारून बघूया. कॉलेज सकाळच, येणे जाणे पायी.. त्यामुळे भूक चेहऱ्यावर स्पष्ट झळकत होती. गेटवर मध्यम वयाचा सुरक्षा रक्षक उभा होता. त्याच्याजवळ जावून तिने विचारले, 'काका, काही काम मिळू शकेल काय मला या दुकानात?' नुकतेच सुपर शॉप उघडले होते. त्यामुळे फारशी वर्दळ नव्हती.' बेटा, मला माहिती तर नाही. पण, तू एक काम कर आत जगन सर आहेत. ते इथले मॅनेजर आहेत. त्यांना भेट. ते तुला सांगू शकतील.' शिल्पाच्या चेहऱ्यावरून तिची गरज त्यांच्या लक्षात आली होती. ती त्यांच्या मुलीच्या वयाची असल्याने त्यांना तिच्या बाबत सहानुभूती वाटली. सुपर शॉपमध्ये काम करणाऱ्या मुले, मुली, स्त्रिया यांच्या कौटुंबिक आर्थिक स्थितीची त्यांना जाण होती. परिस्थितीशी संघर्ष करून उभारी घेणारी व्यक्ति समोरच्याचे दुःख सहज जाणून घेत असते. त्यांनी शिल्पाला आत जाऊन भेट अशी सूचना केली.

शिल्पा त्या मोठ्या सुपर शॉपीच्या आत गेली. तिथे एक मध्यमवयिन गृहस्थ स्टाफला सूचना करीत असल्याचे तिच्या लक्षात आले. ती त्यांच्याजवळ जावून त्यांना म्हणाली, 'नमस्कार सर, आपण जगन सर काय?' ' हो, काही काम होते?' त्यांनी प्रश्न केला. 'हो सर, मला इथे काम मिळू शकेल काय म्हणून विचारायचे होते.' शिल्पाने आपला येण्याचा उद्देश स्पष्ट केला. एक क्षण त्यांनी तिला बघितले आणि म्हणाले, 'ये इकडे बोलू.' शेजारीच त्यांचे छोटेखानी ऑफिस होते. स्टाफ वर लक्ष राहिल अशी रचना होती. मॉनिटरिंग करणारे मोठे स्क्रीन लागले होते. त्यांनी तिला खुर्चीवर बसण्याची खूण केली. शिल्पा बसली. 'बोल, काय काम आहे?' त्यांनी तिला विचारले. 'सर, माझे नाव शिल्पा. मी बी. कॉम.पार्ट वनला शिकत आहे. काही काम मिळू शकेल काय म्हणून चौकशी करायला आले होते.' जगनरावांना तिच्या परिस्थितीचा अंदाज आला. अनेक मुले-मुली नियमित कामाची विचारणा करण्यासाठी भेटत असत. त्यामुळे जगनरावांना मुलांच्या मानसिकतेचा अभ्यास होता. तेही अश्याच परिस्थितीशी संघर्ष करून आल्यामुळे त्यांच्यात अश्या धडपड्या आणि मेहनती मुलांबाबत आत्मीयता होती.

**'कुठे राहतेस?' जगनरावांनी प्रश्न केला.**

**'या शेजारच्या स्लम वसाहतीत राहते.' शिल्पाने मोकळेपणाने उत्तर दिले.**

**'घरी कोणकोण असते?'**

**'आई वडील आणि लहान भाऊ आहे.'**

**'वडील काय करतात?'**

**'मिस्त्री काम करतात.'**

**'आणि आई?'**

'ती छोट्या बाळाला सांभाळायला जाते एका घरी.'

'तुला कामाची का गरज आहे?'

'सर,मला शिकायची इच्छा आहे. मला काम मिळाले तर माझा खर्च मी करू शकेन. आई वडिलांवर भार पडणार नाही.' शिल्पा एका दमात बोलून गेली.

'आता तू कॉलेजमध्ये शिकत आहेस. मग कामाच्या वेळेचे कसे जमवून घेशील?' जगनरावांनी मुळ प्रश्न विचारला.

'सर, मला संधी मिळाली तर मी प्रयत्न करून बघेन की तक्रारीला जागा मिळणार नाही.' शिल्पा कामाबाबत संवेदनशील आहे हे तिच्या उत्तरातून त्यांना जाणवले.

'तू कॉलेज मध्ये शिकतेस, इथले काम तुला माहिती आहे कसे असते. तुला संकोच नाही वाटणार?' त्यांनी एकप्रकारे नव्या मुलांची मानसिक स्थिती लक्षात घेऊन विचारले. 'नाही सर, त्यात संकोच कसला? मला शिकायचे आहे. त्यासाठी मला स्वतः कमवायची इच्छा आहे. घरून विरोध होईल असे वाटत नाही.मी घरी कामाबाबत बोलली आहे. आई बाबांना मी समजावले आहे.' शिल्पा कामाबाबत आग्रही आणि ठाम असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

'इथे तुला खूप काही पगार मिळणार नाही.' जगनरावांनी तिला एकूणच खाजगी क्षेत्रातील कामगारांच्या स्थितीची जाणीव करून दिली. 'सर, काम मिळाले तरी खूप आहे. किमान काम शिकून थोडे पैसे तर मिळतील.' स्वतः कमवून शिकण्याची जिद्द त्यांना भावली. 'ठीक आहे. तू तुझा बायोडाटा, आधारकार्ड झेरॉक्स, दोन पासपोर्ट फोटो मला आणून दे. मोबाईल असेल तर मोबाईल नंबर दे.' त्यांनी सांगितल्यावर शिल्पाने मोबाईल नंबर त्यांना लिहून दिला आणि म्हणाली, 'सर, सायंकाळ पर्यंत आणून देते बायोडाटा वगैरे.' एवढे बोलून ती निघण्यासाठी उभी झाली. निरोप घेतांना ती त्यांना धन्यवाद द्यायला विसरली नाही.

सायंकाळ पर्यंत तिने त्यांच्या सूचनेप्रमाणे सर्व आणून दिले. एक दोन दिवसातच तिला त्यांचा फोन आला. त्यांनी पुन्हा भेटीला बोलावले होते. या खेपेला मुळ मालकाशी त्यांनी भेट करून दिली. जुजबी विचारपूस झाल्यावर त्यांनी कामावर ठेवण्यास अनुमती दिली. जगनरावांनी तिची ज्या सामानाच्या रॅक्सवर तिला काम करायचे आहे ती जागा दाखवली. इतर कामगार महिलांशी ओळख करून दिली आणि दुसऱ्या दिवसापासून कामावर ठीक अकरा वाजता येण्यास सांगितले. तिला काम मिळाल्याचा आनंद झाला होता. शिल्पा कामावर रुजू झाली. अल्पावधीत काम शिकून घेतले. सोबत शिक्षण सुरूच होते. तिथेच कॉम्प्युटर शिकली होती. कोणतेही काम करण्याची, शिकण्याची आणि कामाप्रती एकाग्रता सर्वांना लक्षात आली होती. पुढे त्याच सुपर शॉपमध्ये आता कॅश काउंटर आणि अकाउंट्सचे काम सांभाळू लागली. पैसा ही बऱ्यापैकी हाती येत होता.

आज सकाळीच ती मॅनेजर साहेबांकडे आली.

'सर,आत येऊ?' शिल्पाने केबिनच्या दारातून मॅनेजरला विचारले.

'अरे, ये शिल्पा..' हसत त्यांनी अनुमती दिली. ती आत गेली. त्यांच्यासमोर मिठाईचा बॉक्स केला आणि अभिवादनासाठी खाली वाकली. ते आश्चर्यचकित होऊन बघत होते.

'पेढे. काही विशेष..' त्यांनी स्मित करीत विचारणा केली.

'सर, मी फायनल पास झाले. आजच रिझल्ट आला.' तिनेही हसत मुखाने उत्तर दिले.

'अभिनंदन, शेवटी तू जिद्दीने पदवीधर झालीस. खूप छान. किती टक्के मिळालेत?' त्यांनी आत्मियतेने विचारणा केली.

'सर, जवळपास बासष्ट टक्के मार्क्स मिळालेत.' शिल्पाने उत्तर दिले.

'छान, तुझे एक स्वप्न साकारले. गुड.शुभेच्छा.' मॅनेजर साहेब आनंदित झाल्याचे तिच्या लक्षात आले. ती ही सुखावली. त्यांचा निरोप घेऊन परत फिरतांना त्यांच्याप्रती कृतज्ञता भाव, स्वतःप्रति स्वाभिमान आणि समाधान तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट झळकत होते.●●



अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

# पदर



श्रावणातील पहिल्या पावसाप्रमाणे आज तिचे तन-मन पूर्णपणे न्हाऊन निघाले होते. गुलाबी साडी, गुलाबी बांगड्या आणि आधुनिक फॅशनला साजेसा स्लीव्हलेस ब्लाउज परिधान करून ती त्याच्यासोबत 'गुलाबी साडी आणि लाली लाल' या गाण्यावर पावसाच्या सरींमध्ये हातात हात घालून रील चित्रित करत होती. त्या क्षणाचा तिने नववधूप्रमाणे मनसोक्त आनंद घेतला.

पावसाच्या झुळुकीने तिचा पदर अलगद उडाला आणि प्रेमाने त्याच्या चेहऱ्यावरून हळुवार सरकला. त्या क्षणी ते दोघेही जणू शाहरुख आणि काजोलच भासत होते. तिने तो सुंदर क्षण मोबाईलमध्ये कैद केला आणि सोशल मीडियावरही पोस्ट केला. समीक्षा आधुनिक विचारांची, पण सुसंस्कारित कुटुंबातील मुलगी होती. स्त्रीच्या चारित्र्याचे महत्त्व तिला पूर्णपणे माहीत होते. आई-वडिलांच्या संमतीने तिचा प्रशांतशी विवाह झाला. अगदी डेस्टिनेशन वेडिंग! लग्नानंतर त्यांचा संसार नुकताच सुरू झाला होता. हळदीचा पिवळा रंग जसा त्यांच्या अंगावर चढला, तसाच त्यांच्या संसारालाही आनंदाची झळाळी लाभली. या अल्पावधीत प्रशांतने समीक्षेला सर्व काही दिले - घर, गाडी, दागिने, पैसा आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे तिच्या पदरात मातृत्वाचे अमूल्य सुख ठेवले. भौतिक सुखांपेक्षा मातृत्वाच्या आनंदाने ती अधिक भारावून गेली होती. त्या क्षणी जगात स्वतःपेक्षा अधिक सुखी कोणीच नसल्याची भावना तिच्या मनात होती. माहेर आणि सासर या दोन्ही कुटुंबांत आनंदाचे वातावरण होते. दोन वर्षांचा संसार हळूहळू फुलत होता. प्रथेनुसार बाळंतपणासाठी समीक्षा माहेरी गेली. प्रशांत एकटा पडला. त्याला तिची आठवण यायची आणि समीक्षालाही त्याची. मात्र, तिच्या पदरात वाढणाऱ्या मातृत्वाच्या ओढीत ती अधिक रमू लागली.

काही दिवसांनी तिने एका सुंदर मुलीला जन्म दिला. ती अगदी प्रशांतसारखीच दिसत होती. माहेरच्यांनी तिचे बारसे मोठ्या आनंदात केले. झबले, टोपर, पाळणा, मेव्याचे आणि डिंकाचे लाडू घेऊन समीक्षा पुन्हा सासरी परतली.

घर तेच होते; पण आता त्या घरात एका चिमुकलीचे आगमन झाले होते. तिची इवलीशी पावले, तिचे रडणे, तिची काळजी यात दिवस कसे जात होते ते कळत नव्हते. मात्र, समीक्षा आणि प्रशांत यांच्या नात्यातील तो नवखेपणा आणि ओढ आता उरली नव्हती. प्रशांतच्या स्वभावात आणि वागण्यात बदल जाणवू लागला. फोन आला की तो कट करायचा किंवा बाहेर जाऊन बोलायचा. घरी येण्याची वेळही निश्चित राहिली नव्हती. एक दिवस अचानक त्याचा फोन वाजला. तिने पाहिले की नंबर मित्राच्या नावाने सेव्ह केला होता. संशय आल्याने तिने तो नंबर स्वतःच्या मोबाईलवरून लावला. समोरून एका तरुणीचा आवाज आला.

क्षणात तिच्या विश्वासाचा पाया कोसळला. प्रशांतवर असलेले प्रेम आणि विश्वास एका क्षणात नाहीसे झाले. जणू एखाद्या पारध्याने अचूक नेम धरावा आणि पक्षी सावध होऊन क्षणार्धात उडून जावा, तसे तिचे सुख हातातून निसटले.

आता प्रशांतच्या आयुष्यात समीक्षेशिवाय दुसरी व्यक्ती होती. तो सतत कारणे देत राहिला, खोटे बोलत राहिला. प्रेम, आपुलकी आणि विश्वास हळूहळू संपत गेले. रोजचे वाद, भांडणे आणि तणाव यामुळे घरातील वातावरण निस्तेज झाले. दोन्ही कुटुंबांना ही बाब समजली. प्रशांतने आपली चूक मान्य केली. त्याच्या आई-वडिलांनी त्याची समजूत काढली, 'बायको ही बायकोच असते.' समीक्षाच्या आईनेही, 'झाली त्याच्या हातून चूक. शेवटी तो पुरुष आहे. स्त्रीला बरेच काही सहन करावे लागते,' असे म्हणत तिच्या जखमेवर फुंकर घालण्याचा प्रयत्न केला.

मात्र, या सगळ्यात समीक्षा काय विचार करत होती? तिच्या मनात काय वेदना होत्या? याचा विचार कुणीच केला नाही.

जर समीक्षाच्या आयुष्यात दुसरा पुरुष आला असता, तर प्रशांत, त्याचे कुटुंब आणि समाज यांनी तिलाही अशीच समजून घेतले असते का? तिला स्वीकारले असते का? बाई डोक्यावर पदर घेते, तेव्हा ती सुसंस्कृत समजली जाते. खांद्यावर पदर घेतला, तरी ती सुसंस्कृतच असते. पण तोच पदर जर घसरला, तर तिच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उभे केले जाते. तिला असंस्कृत, वाईट चालीची, अगदी वेश्या म्हणूनही हिणवले जाते. पण पुरुषाला पदर नसतो. त्यामुळे त्याला अशा शब्दांचा सामना करावा लागत नाही. मात्र, तो स्त्रीच्या डोळ्यांतील विश्वास, प्रेम आणि सन्मान कायमचा गमावून बसतो. आज पुन्हा पाऊस पडत होता. समीक्षाने लाल साडी, लाल बांगड्या आणि लाल स्लीव्हलेस ब्लाउज घातला. 'लाल लाल कलरची बांगडी' या गाण्यावर तिने प्रशांतसोबत पुन्हा एक रील चित्रित केली. पुन्हा एकदा तिचा पदर त्याच्या चेहऱ्यावरून अलगद सरकला; पण त्या पदरात आता प्रेम नव्हते, विश्वास नव्हता, आदर नव्हता, होती फक्त तडजोड. आज समाजात अशी कितीतरी कुटुंबे आहेत, ज्यांचा संसार विवाहबाह्य संबंध असूनही केवळ तडजोडीवर टिकून आहे. भगवान बुद्धांच्या पंचशीलातील एक महत्त्वाचे शील आहे :- 'कामेसु मिच्छाचारा वेरमणी सिक्खापदं समादियामि.' पती-पत्नीचे नाते विश्वासावर उभे असते. एकदा विश्वास तुटला की उरते ती केवळ तडजोड. माझ्या मते, निसर्गाने स्त्री आणि पुरुष यांना विवाह या पवित्र बंधनात जोडले आहे आणि त्या नात्याचा पाया म्हणजे विश्वास. तोच पाया ढासळला की उरते फक्त तडजोड. तडजोड करत आयुष्य जगण्यापेक्षा नैतिकतेचा आधार घेत परस्परांचा आदर, प्रामाणिकपणा आणि विश्वास जपत विवाह टिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. एकदा स्वतःलाच विचारून पाहा, तुमच्या नात्यात प्रेम आहे की फक्त तडजोड?●●



प्रीती तिरपुडे
7972119871

## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - २०१

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बुलढाणा



बुलढाणा शहरातील जयस्तंभ चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवण्यासंदर्भात विविध संघटना आणि स्थानिकांकडून दीर्घकाळ मागणी होती, जयस्तंभ चौकात उभारणार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हे बुलढाणा जिल्ह्यातील विशेष आकर्षण आहे. येथे विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असतात..

संवाद मित्र
राजू थुल
9423420031

## महत्वाचे



### मनकेंद्रित अभ्यास विषयक कार्यशाळा

**अकोला :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधन भवन, खडकी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठानतर्फे आयोजित धम्मशिबिरात प्रा. अरुण बुंदेले यांच्या 'अभ्यास विषयक कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. मुकुंद भारसाकळे होते. प्रा. बुंदेले यांनी विद्यार्थ्यांनी नियमित, मनकेंद्रित आणि नियोजनबद्ध अभ्यास केल्यास कोणत्याही क्षेत्रात यश मिळविता येते, असे प्रतिपादन केले. त्यांनी मराठी वर्णमाला, शुद्धलेखन, हस्ताक्षर, व्याकरण, उत्तरपत्रिका लेखन आणि अभ्यासाच्या प्रभावी पद्धतींसह विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. बुंदेले यांनी प्रतिष्ठानच्या ग्रंथालयासाठी पुस्तके व 'शिक्षण संक्रमण' मासिकांच्या प्रती तसेच विद्यार्थ्यांना नोटबुक भेट दिले. अध्यक्ष प्रा. मुकुंद भारसाकळे यांनी ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन रमेश तायडे यांनी, तर आभार तुषार खंडेराव यांनी मानले.

### एसीजेपीच्या साप्ताहिक सभेत दक्षिण कोरियन प्रतिनिधींची उपस्थिती

**नागपूर :** डॉ. आंबेडकर सेंटर फॉर जस्टिस अँड पीस (एसीजेपी) या आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेची ६५२ वी साप्ताहिक सभा रविवार, १२ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन, लष्करी बाग, नागपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. सभेला दक्षिण कोरियाचे प्रतिनिधी मि. मायेन सू किम विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, ऑक्टोबर २०२६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर येथे तथागत गौतम बुद्ध यांच्या जीवनावर आधारित सुमारे अडीच तासांचे नाट्य सादरीकरण करण्याच्या प्रस्तावाबाबत चर्चा होणार आहे. याशिवाय 'जयंती-२' चित्रपटाचे दिग्दर्शक आयु. शैलेश नरवडे आणि एसीजेपीचे आयु. प्रमोद सांगोडे हेही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या विशेष सभेला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रीय मार्गदर्शक के. जे. चव्हाण आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष देवेंद्र ताराचंद घरडे यांनी केले आहे.

### जल जीवन मिशनमधील गैरप्रकारांची चौकशी करा : 'आसरा'

**मुंबई :** केंद्राच्या 'जल जीवन मिशन' योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्रात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत 'एसोसिएशन ऑफ सोशल अँड आरटीआय ॲक्टिव्हिस्ट्स' (आसरा- ASRA) या संघटनेने मुख्यमंत्री यांच्याकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. संघटनेचे अध्यक्ष संजय थुल यांनी यासंदर्भात पत्र पाठवून नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांच्या अहवालातील मुद्द्यांकडे सरकारचे लक्ष वेधले आहे.
पत्रानुसार, योजनेची प्रगती वाढवून दाखवण्यासाठी सुमारे २७.७४ लाख नळजोडण्या शासकीय योजनेत दाखवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच २०१९ ते २०२४ या कालावधीत सुरू करण्यात आलेल्या ५१,५६० पाणीपुरवठा योजनांपैकी ३८,८५७ योजना अद्याप अपूर्ण असल्याचा दावा करण्यात आला आहे. अनेक गावांमध्ये प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू नसतानाही 'हर घर जल' प्रमाणपत्र देण्यात आल्याचा तसेच ग्रामपंचायतींची मंजुरी न घेता योजना राबविल्याचा आरोपही पत्रात करण्यात आला आहे. 'आसरा'ने या प्रकरणाची निष्पक्ष उच्चस्तरीय चौकशी, दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### आरबीएसके शिबिरात ६२ बालकांची 2D इको तपासणी

**गोंदिया :** राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (RBSK) व जिल्हा प्रारंभिक हस्तक्षेप केंद्र (DEIC) यांच्या संयुक्त विद्यमाने बाई गंगाबाई महिला रुग्णालय, गोंदिया येथे संशयित जन्मजात हृदयरोग असलेल्या बालकांसाठी मोफत 2D इको तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले यांच्या हस्ते झाले. या शिबिरात लता मंगेशकर हॉस्पिटल, नागपूर येथील बालहृदयरोग तज्ज्ञ डॉ. मनीष चोखंदारे यांनी ६२ बालकांची तपासणी केली. त्यापैकी १५ बालके हृदय शस्त्रक्रियेसाठी पात्र, ८ बालकांना फॉलो-अपची आवश्यकता, तर ३९ बालके पूर्णपणे सामान्य असल्याचे निदान झाले. यावेळी डॉ. पुरुषोत्तम पटले यांनी जन्मजात हृदयरोगाचे वेळेत निदान व उपचार झाल्यास बालकांना निरोगी जीवन जगता येते, असे सांगून पालकांनी शासनाच्या मोफत आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. डॉ. सुवर्णा हुबेकर यांनी गर्भवती महिलांनी नियमित प्रसूतीपूर्व तपासण्या, संतुलित आहार, फॉलिक ॲसिड, लसीकरण आणि नवजात बालकांमधील धोक्याची लक्षणे ओळखण्याबाबत मार्गदर्शन केले.



## शिक्षकांनी दुसऱ्या स्वातंत्र्य आंदोलनासाठी सज्ज व्हावे : प्रशांत वंजारे

### सामूहिक रजा आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद





**यवतमाळ :** देश आज कठीण परिस्थितीतून मार्गक्रमण करत आहे. देशातील संविधानीक संस्था मोडकळीस आलेल्या आहेत किंवा सत्ताधारी पक्षाच्या बटीक तरी झालेल्या आहेत. अशा परिस्थितीत सामान्य माणसाला न्याय मिळणे दुरापास्त झाले आहे. अशा अनागोंदीच्या वातावरणात शिक्षकांवर मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षकांनी स्वातंत्र्य चळवळीत असामान्य योगदान दिले आहे. आज तिच परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शिक्षकांनी दुसऱ्या स्वातंत्र्य लढ्यासाठी सज्ज राहावे असे आवाहन प्रशांत वंजारे यांनी केले ते शिक्षक समन्वय समिती यवतमाळच्या वतीने सामूहिक रजा आंदोलनात बोलत होते. वंजारे पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्था ही देशभरात भ्रष्ट आणि बदनाम म्हणून नावारूपाला आलेली आहे. सर्व बाजूंनी शिक्षकांची हेळसांड सुरू असून त्यांचे मूलभूत अधिकार हिरावून घेतले जात आहेत. अशावेळी येणाऱ्या पिढ्यांसाठी लोकशाही व्यवस्था कायम रहावी असे वाटत असेल तर शिक्षकांना लढल्या शिवाय पर्याय नाही.
शिक्षकांची अशैक्षणिक कामातून तसेच टिईटी परिक्षेतुन मुक्तता व्हावी. मतदार यादी पुनर्निरीक्षण कार्यक्रम स्वतंत्र यंत्रणेकडे सोपविण्यात यावे, सततच्या ऑनलाईन, ऑफलाईन माहिती मागविणे, शिक्षकांना अपमानास्पद भाषेचा वापर करणे व इतर मागण्यांसाठी एक दिवसीय शाळा बंद आंदोलन दि. ९ जुलै रोज गुरुवारला आयोजित केले होते. सदर आंदोलनात शाळा, विद्यार्थी व शिक्षकांचे अस्तित्व टिकविण्यासाठी हजारो शिक्षक स्वेच्छेने शाळा बंद आंदोलनात सहभागी झाले होते.
आंदोलनात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ (शिवाजीराव पाटील प्रणित) अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ, आंबेडकरी शिक्षक संघम, आयडियल बहुजन टिचर सोशियशन, यवतमाळ, जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षक संघ यवतमाळ, एकल शिक्षक सेवा मंच यवतमाळ, प्रहार शिक्षक संघटना यवतमाळ, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, महाराष्ट्र राज्य जुनी पेंशन संघटना इत्यादी संघटना सहभागी होत्या.
आंदोलनस्थळी सहभागी संघटनाच्या नेत्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचलन प्रफुल्ल फुंडकर यांनी आभार आंदोलनाचे निमंत्रक संजय काळे यांनी मानले.

## सिटू तर्फे 10 जुलै काळा दिवस साजरा करून आशा व गटप्रवर्तक यांनी केले संविधान चौकात विशाल धरणे आंदोलन



**नागपूर :** आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (CITU) नागपूर जिल्हा तर्फे संविधान चौकात आशा वर्कर व गटप्रवर्तक यांच्या विविध मागण्यांना घेऊन देशव्यापी काळा दिवस साजरा करण्याच्या उपलक्षांमध्ये शेकडो कर्मचाऱ्यांनी धरणे आंदोलन करून तीव्र निदर्शने केली. युनियनचे अध्यक्ष कॉ. राजेंद्र साठे यांनी सांगितले की मार्च 2025 रोजी केंद्रीय आरोग्य मंत्री डॉक्टर जे पी नड्डा यांनी संसदेमध्ये आशा वर्कर यांना पंधराशे रुपये ची मानधन वाढ आम्ही देण्यास तयार आहोत अशी घोषणा केली. परंतु घोषणा करून सुद्धा त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नसून आशा वर्कर च्या तुलनेत गटप्रवर्तकांना सुद्धा 2000 मानधन वाढ मार्च 2025 पासून द्यावी अशी शासनाकडे आम्ही मागणी करत आहोत. दहा वर्षे पूर्ण झालेल्या इतर सर्व कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेमध्ये सामावून घेण्यात येत आहे परंतु आरोग्य क्षेत्राच्या मुख्य खाना असलेल्या आशा वर्कर व गटप्रोतक यांना का डावलण्यात येत आहे? त्यांना सुद्धा शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन सन्मानित करावे असे त्यांनी सांगितले. आंदोलन दरम्यान संविधान चौकात शेकडोच्या संख्येने भाडे वस्त्र धारण करून व हातात काळे झेंडे घेऊन आशा वर्कर व गटप्रवर्तक यांनी तीव्र निदर्शने करून निवांसी जिल्हाधिकारी अनुप खान्डे यांना केंद्रीय आरोग्यमंत्र्यांच्या नावे निवेदन सादर केले. आंदोलनाचे नेतृत्व कॉ. राजेंद्र साठे, कॉ. प्रीती मेश्राम, कॉ. लक्ष्मी कोत्तेजवार, कॉ.रंजना पौनीकर, कॉ. माया कावळे, कॉ. उषा मेश्राम, कॉ. सुनंदा बसेशंकर यांनी केले असून शेकडे आशा वर्कर व गटप्रवर्तक उपस्थित होत्या.

## राष्ट्रीय अनुसूचित जाती-जमाती विकास परिषदेच्या महाराष्ट्र महिला कार्यकारिणीची घोषणा



**नागपूर :** राष्ट्रीय अनुसूचित जाती-जमाती विकास परिषद, नवी दिल्लीच्या महाराष्ट्र प्रदेश (महिला) शाखेची बैठक नागपूर येथे महाराष्ट्र प्रदेश (महिला) अध्यक्षा संघमित्रा ढोके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध साहित्यिक व आंबेडकरी विचारवंत डॉ. सविता सुमेध कांबळे उपस्थित होत्या.
बैठकीत संघटनेची उद्दिष्टे, जातिव्यवस्था निर्मूलन, सामाजिक, शैक्षणिक, न्यायिक, कायदेविषयक, सांस्कृतिक, पर्यावरण, रोजगार, महिला, बालक व दिव्यांगांच्या प्रश्नांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर राज्यस्तरीय महिला कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. कार्यकारिणीत संघमित्रा ढोके अध्यक्ष, पौर्णिमा मेश्राम, सुशीला घोटेकर, दीपाली सुशील पाटील आणि वनिता मायावंत बोरकर उपाध्यक्ष, डॉ. सविता सुमेध कांबळे, मृणालिनी दहिवाडे आणि डॉ. वंदना इंगळे महासचिव, डॉ. दीक्षा कोकाटे, माधुरी लोखंडे, मनीषा जमागडे आणि प्रगती कांबळे सचिव, तर प्रमोदिनी जुमले, कविता गवळी आणि मनीषा थुल सहसचिव म्हणून निवड करण्यात आली. तसेच डॉ. बनसोड, माया पाटील यांच्यासह इतर सदस्यांचीही कार्यकारिणीत निवड करण्यात आली.
नवीन कार्यकारिणीने संघटनेच्या ध्येय-धोरणानुसार सामाजिक उत्थानासाठी पारदर्शक, संघटित आणि गतिशील पद्धतीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन मृणालिनी दहिवाडे यांनी केले.

## पॅरामेडिकल कोर्समुळे तरुणांना रोजगाराच्या संधी : डॉ. संजय धोटे

**नागपूर :** नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल, नागपूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉ. चंद्रमणी कांबळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय धोटे, प्रा. संध्या राजूरकर, लेखिका सुजाता लोखंडे आणि हर्षल गडपायले उपस्थित होते. यावेळी डॉ. संजय धोटे यांनी पॅरामेडिकल क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध असून, मेहनत आणि समर्पणाच्या बळावर विद्यार्थी उज्ज्वल भविष्य घडवू शकतात, असे सांगितले. प्रा. संध्या राजूरकर यांनी सचोटी आणि प्रामाणिकपणाचे महत्त्व अधोरेखित केले, तर सुजाता लोखंडे यांनी आरोग्य सेवेत करुणा आणि मैत्रीभाव आवश्यक असल्याचे सांगितले. प्रास्ताविकात डॉ. सूर्यकांता कांबळे यांनी पॅरामेडिकल शिक्षणातील विविध रोजगार संधींची माहिती दिली. डॉ. चंद्रमणी कांबळे यांनी प्रत्येक विद्यार्थी डॉक्टर होऊ शकत नसला तरी पॅरामेडिकल क्षेत्रातून रुग्णसेवा आणि वैद्यकीय क्षेत्रात करिअर घडविण्याची उत्तम संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. यावेळी इंटरनशिप व नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी अनुभव कथन केले. कार्यक्रमास शिक्षक, वरिष्ठ विद्यार्थी, पालक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन माधुरी भुंबर व आचल डोंगरे यांनी केले, तर आभार मृणाल खोब्रागडे यांनी मानले.

## जागतिक शोधपत्रिकेत तेजस्विनी बनसोडे यांचा शोधनिबंध



**कोल्हापूर :** विज्ञान आणि संशोधन क्षेत्रात कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. येथील विवेकानंद महाविद्यालयातील एम.एस्सी. अंतिम वर्षाची विद्यार्थिनी तेजस्विनी एस. बनसोडे हिचा शोधनिबंध जागतिक कीर्तीच्या सेरॅमिक इंटरनॅशनल या प्रतिष्ठित वैज्ञानिक शोधपत्रिकेत प्रकाशित झाला आहे. शिक्षण सुरू असतानाच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन नियतकालिकात स्थान मिळविणारी तेजस्विनी ही बौद्ध समाजातील होतकरू विद्यार्थिनी असून, तिच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.'Sol-gel processed superhydrophilic $TiO_2$–$SiO_2$ coatings on marble for outdoor photocatalytic self-cleaning application' या विषयावरील संशोधनात संगमरवरी पृष्ठभागासाठी असे विशेष कोटिंग विकसित करण्यात आले आहे, ज्यामुळे सूर्यप्रकाश आणि पाण्याच्या साहाय्याने पृष्ठभागावरील घाण आपोआप दूर होण्यास मदत होते. या तंत्रज्ञानाचा उपयोग ऐतिहासिक वास्तू, स्मारके आणि संगमरवरी इमारती दीर्घकाळ स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यासाठी होऊ शकतो.
या संशोधनात तेजस्विनी बनसोडे यांच्यासह अक्षय जुंदळे, ऋतुजा एकुंडे, सुदर्शन खुटळे, शुभम राशिवडे, राजकुमार सिधारेड्डी, राजाराम सुतार, शानहू लिऊ तसेच मार्गदर्शक प्रा. संजय लठ्ठे यांचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे.
एम.एस्सी.चे शिक्षण घेत असतानाच जागतिक दर्जाच्या शोधपत्रिकेत शोधनिबंध प्रकाशित झाल्याने विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर तसेच बौद्ध समाजासाठी हा अभिमानाचा क्षण मानला जात आहे. तेजस्विनीच्या या यशाबद्दल महाविद्यालय, प्राध्यापक, कुटुंबीय आणि मित्रपरिवाराकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या भावी वैज्ञानिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## कष्टाच्या पैशाचे मूल्य लयभारी : महेंद्र गायकवाड

### वीर संभाजी ज्येष्ठ नागरिक संघात गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त महेंद्र गायकवाड यांचा सत्कार




**पुणे :** आयुष्यात पैशाचे महत्त्व त्या काळात प्रकर्षाने जाणवले, जेव्हा घरात आर्थिक अडचणींमुळे इच्छेनुसार शिक्षण घेता आले नाही. मात्र, मिळालेल्या शिक्षणाच्या गुणवत्तेच्या आधारावर नोकरी करताना कामावर जीवापाड प्रेम केले आणि त्यातून मिळालेल्या पगारातून कुटुंब, मैत्री आणि समाज यांची जबाबदारी पार पाडली, असे प्रतिपादन गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त महेंद्र गायकवाड यांनी केले.
रहाटणी-पिंपळे सौदागर येथील वीर संभाजी ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या वतीने नुकताच त्यांचा सत्कार करण्यात आला. माजी उच्च अधिकारी केशव मेश्राम, शशिकांत शेलार आणि डॉ. डी. एस. कोरे यांच्या हस्ते महेंद्र गायकवाड यांना 'सरपंचनामा' हे पुस्तक व गुलाबाचे रोप असलेली कुंडी भेट देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुवासाहेब अहिवळे होते. ॲड. वाय. डी. वाघमारे यांनी ज्येष्ठ नागरिकांनी सामाजिक कार्यात अधिक योगदान देण्याची गरज व्यक्त केली. रामनाथ उगले यांनी आपल्या मनोगतात महेंद्र गायकवाड यांचा स्वभाव बोलका, शांत, संयमी व शिस्तप्रिय असल्याचे सांगत सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून दिला. सेवानिवृत्तीनंतरही ते पर्यटन व्यवसायात मदत करतात, असे उद्योजिका सुदर्शन ठोंबरे यांनी नमूद केले.
दै. बहुजन सौरभचे ऑनलाइन वाचन करून ज्ञानात भर पडते, याबाबत ते नेहमी संवाद साधतात, असे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी सांगितले.
संघाचे सचिव तथा कर्मचारी नेते पुरुषोत्तम गाणार यांनी महेंद्र गायकवाड हे सर्वांना सोबत घेऊन काम करणारे तरुण व्यक्तिमत्त्व असून त्यांच्या व्यापक परिचयामुळे त्यांना सर्वत्र ओळखले जाते, असे गौरवोद्गार काढले. आमच्या सातारा जिल्ह्यातील महेंद्र गायकवाड पुणे जिल्ह्यात स्थिरावले आहे त्याच बरोबर महेंद्रने सामाजिक बांधिलकीचा आपल्या कृतीतून दाखवून दिले असे अध्यक्षीय भाषणात बुवा साहेब अहिवळे यांनी सांगितले आहे.
या कार्यक्रमास डॉ. भीमराव सरवदे, लेखक विठ्ठल पाटील, शशिकांत शेलार, शिवाप्पा पसारकर, महेंद्र गायकवाड, भीमा सवाई, मनोहर आठवले, भाऊराव दहागावकर, गुलाब आढाव यांच्यासह संघाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रमाई नगर शहीदांना मानवंदना; काळा दिवस पाळला



**नागपूर :** संविधान परिवार व बौद्धप्रिय वा. को. गाणार जन्मशताब्दी समारोह समितीच्या संयुक्त विद्यमाने रमाई नगर, घाटकोपर (मुंबई) येथील ११ जुलै १९९७ रोजी झालेल्या गोळीबारातील शहीदांना अभिवादन करण्यासाठी 'काळा दिवस' पाळण्यात आला. सकाळी १० वाजता जाटतरोडी चौक येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शहीदांना मानवंदना देण्यात आली.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समता सैनिक दलाचे राष्ट्रीय कमांडर अशोक बोंदाडे होते.
प्रमुख उपस्थितीमध्ये माजी न्यायमूर्ती नरेश बनसोड, आंबेडकरी जलसाकार व गीतकार सिद्धार्थ सरदार, बौद्धप्रिय वा. को. गाणार जन्मशताब्दी समारोह समितीचे संयोजक सुरेश गाणार यांची उपस्थिती होती.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक संविधान परिवाराचे मुख्य सहसंयोजक प्रा. राहुल मून यांनी केले. त्यांनी ११ जुलै १९९७ रोजी रमाई नगर, घाटकोपर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना झाल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर निषेधासाठी जमलेल्या आंदोलकांवर झालेल्या पोलिस गोळीबारात ११ भीमसैनिक शहीद झाल्याचा उल्लेख करत, या घटनेची चौकशी करणाऱ्या गुंडेवार आयोगाच्या निष्कर्षांनंतरही दोषींवर कठोर कारवाई झालेली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. संबंधित अधिकाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेतील खुनाच्या गुन्ह्यांप्रमाणे कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी पुन्हा केली.
अध्यक्षीय भाषणात अशोक बोंदाडे यांनी सामाजिक न्यायासाठीचा संघर्ष सातत्याने सुरू ठेवण्याचे आवाहन केले. समाजावरील ऐतिहासिक अन्याय आणि अत्याचारांची जाणीव ठेवून इतिहासातून प्रेरणा घेत संघटितपणे पुढे जाण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.
या कार्यक्रमास सुरेश तामगाडगे, सुरेश गाणार, सिद्धार्थ सरदार, दिलीप रंगारी, मून, रामदास सोनटक्के, राजेंद्र गणवीर, केवल कांबळे, वैभव कांबळे, प्रमोद मून, जितेंद्र जिभे, नरेश गायकवाड, अनिल ईलमकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. राजेंद्र गणवीर यांनी आभार प्रदर्शन केला.

## शालेय बस सुरक्षेच्या नियमांची कठोर अंमलबजावणी करा; रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया



**नागपूर:** विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शालेय बस व इतर वाहतूक सुविधांबाबत शासनाने निर्धारित केलेल्या सुरक्षा नियमांची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, नागपूर शहरच्या वतीने विभागीय उपसंचालक (शिक्षण), नागपूर यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनात सर्वोच्च न्यायालयाच्या M.C. Mehta विरुद्ध Union of India प्रकरणातील निर्देश, महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस) नियम, २०११ तसेच शासनाच्या शालेय बस सुरक्षा मार्गदर्शक सूचनांची राज्यातील सर्व शाळांमध्ये काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली.
यासोबतच प्रत्येक शाळेतील शालेय बस सुरक्षा समित्यांची नियमित तपासणी करण्यात यावी, बसमध्ये जीपीएस, सीसीटीव्ही कॅमेरे, अग्निशमन यंत्र, प्रथमोपचार पेटी आणि आपत्कालीन बाहेर पडण्याची व्यवस्था अनिवार्य करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच चालक व वाहकांची पोलीस पडताळणी, वाहनांची नियमित फिटनेस तपासणी आणि बसमध्ये क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक रोखण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्याची मागणीही करण्यात आली.
नियमांचे पालन न करणाऱ्या शाळा, बसचालक व संबंधित संस्थांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने मांडली.
यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया नागपूर प्रदेशाध्यक्ष प्रकाश कुंभे, नागपूर शहर कार्याध्यक्ष क्षितिज गायकवाड, शहर महासचिव रजत महेशगवळी तसेच रमेश जीवने आणि अमन खरे उपस्थित होते.

## नवयुवक उच्च प्राथमिक शाळेत पालक सभेत पुस्तक वाटप



**कामठी :** ग्रामविकास एज्युकेशन सोसायटी संचालित नवयुवक उच्च प्राथमिक शाळा, गौतमनगर येथे मुख्याध्यापक विजय नंदनवार यांच्या अध्यक्षतेखाली पालक सभेचे आयोजन करण्यात आले. संस्थाध्यक्ष सिताराम रडके, भदंत नागदीपंकर महास्थवीर, संस्था सचिव पंकज रडके, वंदना गजभिये, वर्षा गजभिये व पालक प्रतिनिधी वैशाली जैसवार यांची प्रमुख उपस्थिती होती.
सभेत विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, नियमित उपस्थिती, शालेय गणवेश, विविध सहशालेय उपक्रम, स्पर्धा परीक्षा तसेच समाजकल्याण, आदिवासी व अल्पसंख्याक विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक-पालक संघ, परिवहन समिती, शालेय पोषण आहार समिती व सखी सावित्री समितीची सर्वानुमते निवड करण्यात आली. करुणा गणवीर यांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले, तर संगीता गोडबोले यांनी इयत्ता १ ते ७ मधील प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना शालेय दप्तर देऊन गौरविले. पालकांनी नियमित शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घ्यावा, असे आवाहन मुख्याध्यापक विजय नंदनवार यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन राजकुमार शेन्डे यांनी केले, तर आभार प्रदर्शन दिलीप मस्की यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राखी बागडे, दीक्षा फुले-डोंगरे व विभा सोनडवले यांनी सहकार्य केले.

## ईएसआयएस रुग्णालयात मोफत मॅमोग्राफी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद




**नागपूर :** राज्य कामगार विमा सोसायटी (ई एस आ य ए स) रुग्णालय, सोमवारी पेठ येथे स्तनाच्या कर्करोगाबाबत जनजागृती आणि लवकर निदानाच्या उद्देशाने आयोजित मोफत मॅमोग्राफी तपासणी शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात १०० हून अधिक महिलांची तपासणी व मॅमोग्राफी करण्यात आली.
शिबिराचे उद्घाटन वैद्यकीय अधीक्षक डॉ. ईशान घुसे आणि कर्करोग तज्ज्ञ डॉ. मुकेश बंग यांच्या हस्ते झाले. यावेळी स्तनाच्या कर्करोगाचे लवकर निदान, नियमित तपासणीचे महत्त्व आणि प्रतिबंधात्मक काळजी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.
शिबिराचे मुख्य संयोजक डॉ. हर्षवर्धन कांबळे होते. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. स्वाती उमाटे यांनी महिलांची तपासणी व समुपदेशन केले. Doctors For You संस्थेच्या सहकार्याने आयोजित या शिबिरात डॉ. हीना चव्हाण, डॉ. प्रियांका चांदणखेडे, डॉ. किशोर गिरी, डॉ. फैजान खान, डॉ. स्वप्नील वाठोरे तसेच रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.
या उपक्रमामुळे महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाबाबत जनजागृती वाढण्यास मदत झाली असून, ₹लवकर निदान म्हणजे प्रभावी उपचार₹ हा संदेश प्रभावीपणे पोहोचल्याचे रुग्णालय प्रशासनाने सांगितले. भविष्यातही अशा आरोग्य जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648